डॉ. प्रभाकर देसाई
एम्.ए., पीएच् डी.
संचालक

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## राष्ट्रीय सेवा योजना

गणेशखिंड, पुणे – ४११ ००७

कार्यालय क्र. : ०२० – २५६९७३४१
०२०–२५६२२६८८/८९
मोबाईल : ९८८१९०८०२०
०२० – २५६२२६९२

संदर्भ : रासेयो/२०२०/६१ दि. २१/०९/२०२०

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक/विभागप्रमुख,
संबधित महाविद्यालये/विभाग/परिसंस्था,
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे, अहमदनगर, नाशिक.

विषय : '२४ सप्टेंबर रासेयो दिना' निमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्याबाबत

महोदय,

महाविद्यालयीन विद्यार्थ्यांच्या मनात सामाजिक जाणीव निर्माण करणे व त्यांचा सर्वांगीण व्यक्तिमत्त्वविकास घडवून आणणे या उद्देशाने स्वावलंबन, चारित्र्यवर्धन व सामाजिक बांधिलकी या मूल्यांचा समन्वय नवीन शिक्षणपद्धतीने घडवून आणण्यासाठी महात्मा गांधी जन्मशताब्दी निमित्त २४ सप्टेंबर १९६९ साली महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी राष्ट्रीय सेवा योजना सुरू करण्यात आली.

त्यानुसार प्रत्येक वर्षी '२४ सप्टेंबर' हा दिवस 'राष्ट्रीय सेवा योजना दिन' म्हणून महाविद्यालयांमध्ये साजरा करण्यात येतो. यानिमित्ताने मा. राज्यसंपर्क अधिकारी यांच्या पत्रानुसार 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' या उपक्रमामध्ये आपल्या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांचे योगदान महत्वाचे व अनिवार्य आहे. या अनुषंगाने आपल्या महाविद्यालयामध्ये रासेयो स्वयंसेवकांमार्फत या नाविण्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे. कोरोनाचा प्रादुर्भाव पाहता सामाजिक अंतर ठेवून व प्रशासनाचे नियम पाळून उपक्रमांचे आयोजन करावे. सदर उपक्रमांचे आयोजन करून त्याचा संक्षिप्त अहवाल फोटोसह nss_student_list@pun.unipune.ac.in या मेल आयडीवर त्वरीत पाठवण्यात यावा. महाविद्यालयाने सदर उपक्रमाचा खर्च रासेयो नियमित कार्यक्रमांमधून करण्यात यावा. कळावे, ही विनंती.

संचालक
राष्ट्रीय सेवा योजना